सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

संचालनालय, लेखा व कोषागारे

पाचवा मजला, नविन प्रशासकिय इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई-४०००३२.

दूरध्वनीक्रमांक :-०२२-२२८८०११७ / २२८८०१०६ E-mail:- director-dat@mah.gov.in

Website:-www.mahakosh.gov.in jdit-dat@mah.gov.in

---

क्र.संलेको/संगणक/ नस्ती क्र. ६७/ ०१.२०२६/ 54/0026 दि. 4 FEB 2026

प्रति,

अधिदान व लेखा अधिकारी,
अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

विषय :- आभासी वैयक्तिक ठेव लेखा व्यवस्था व कार्यपध्दतीबाबत.

संदर्भ :- १. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. अलेका/ असप-२१/ VPDA/ d२१b/ २०२५/ जा.क्र.१४८, दि.२२.१२.२०२५

२. वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२३/ प्र.क्र.११०/ २०२३/ कोषा प्रशा-५, दि.१४.०२.२०२४.

३. वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२३/ प्र.क्र.११०/ २०२३/ कोषा प्रशा-५, दि.१२.०३.२०२५.

दि.१४.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र कोषागार नियम ४४ या नमुन्यात सादर होणाऱ्या सहायक अनुदानाच्या देयकांच्या जलद संवितरण व संनियंत्रणासाठी आभासी वैयक्तिक ठेव लेखा व्यवस्था व कार्यपध्दती लागू करण्यात आली आहे.

दि.१२.०३.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये म.को.नि.-४४ या देयक नमुन्याचा वापर केवळ ३१-सहायक अनुदाने वेतनेतर आणि ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान या उद्दिष्ट शीर्षांसाठी करण्याबाबत तसेच यापुढे आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना सहायक अनुदानेतर उद्दिष्ट शीर्षांसाठी म.को.नि.-४४ या देयक नमुन्याचा वापर करता येणार नाही अशी तरतुद विहीत केली आहे.

त्यानुसार ३१-सहायक अनुदाने वेतनेतर व ३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदानाची म.को.नि.-४४ या नमुन्यात सादर केलेली देयके पारीत केली जातात.

२०-इतर प्रशासकीय खर्च, ३२-अंशदाने आणि ५४-गुंतवणूक या उद्दिष्ट शीर्षामधील देयके कोणत्या देयक नमुन्यात तयार अथवा स्विकृत करण्यात यावीत याबाबत योग्य ते मार्गदर्शन तथा आदेश होणेबाबत आपल्या उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये संचालनालयास विनंती केली आहे.

उद्दीष्ट शिर्ष २० (इतर प्रशासनिक खर्च), ३२ (अंशदाने), ५४ (गुंतवणूक) मधील विशिष्ट देयक प्रकार (Bill Type) साठी मकोनि-४४ या नमुन्याचा वापर करण्यात येत होता; परंतु संदर्भ क्र.३ चे शासन आदेश विचारात घेता आता उक्त उद्दीष्ट शिर्षांची देयके मकोनि-४४ या नमुन्यामध्ये पारीत करता येणार नाहीत.

या सर्व देयक प्रकारामध्ये प्रामुख्याने रकमा आहरित करुन आहरण व संवितरण अधिकारी अथवा त्यांनी निर्देशित केलेल्या अदात्यांना वितरित करण्यात येतात. या सर्व बाबीसाठी निश्चित असे नमुने निर्धारित केलेले नाहीत. देयकामधील तपशीलांचा विचार करता नमुना मकोनि-४४ आणि मकोनि-४५अ मध्ये उपलब्ध असणारी माहिती समान आहे.

सबब संदर्भ क्र.३ अन्वये मकोनि-४४ चा वापर प्रतिबंधित झालेल्या सर्वच उद्दीष्ट शिर्षामधील ज्या बाबींसाठी (Bill Type) पुर्वी नमुना मकोनि-४४ चा वापर करण्यात येत होता त्या देयक प्रकारासाठी (Bill Type) आता मकोनि-४५अ या नमुन्याचा वापरण्यात यावा. TreasuryNet प्रणालीमध्ये वरील प्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

संबंधित उद्दीष्ट शिर्षा खाली देयके आहरीत करताना, कोषागार नियमाप्रमाणे इतर कोणताही नमुना प्राधीकृत केलेला नाही अशाच बाबीसाठी मकोनि-४५अ वापरला जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

3/2/26

**(दीपा देशपांडे)**
**संचालक, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

*** प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी:-**

१. वरिष्ठ कोषागार अधिकारी (सर्व)
२. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
३. उपकोषागार अधिकारी (सर्व) (**जिल्हा कोषागार अधिकारी यांचे मार्फत)
/-यांना सुचित करण्यात येते की, कोणत्याही उद्दीष्ट शिर्षा खाली मकोनि-४५अ मध्ये देयक स्विकारताना त्यांनी उक्त देयक प्रकारासाठी प्रणालीमध्ये अन्य देयक नमुना उपलब्ध नाही याची खात्री करुनच देयके मकोनि-४५अ मध्ये स्विकारावीत.

*** प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीसाठी:**

१. सहसंचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे (सर्व)
२. उपसंचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे (सर्व)
३. सहायक संचालक (ट्रेझरी नेट)
४. राज्य मास्टर डेटा नियंत्रक(सर्व)
५. कोषागार निरिक्षण शाखा

*** प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीसाठी :**

राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्रपुणे ,

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

मा.प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

मा.महालेखाकार (लेखा व हकदारी), महाराष्ट्र-१, मुंबई

**(*महाकोषद्वारे निर्गमित)**